"दैनिक इनकलाब उर्दू"
" Daily Urdu Inquilab "

दि. 09/01/2023
Date: 09/01/2023

# سوشل کالج شولاپور میں بلڈ ڈونیشن کیمپ کا اہتمام



**شولاپور:** سوشل کالج میں اطہر بلڈ بینک اور ایچ ڈی ایف سی بینک کے اشتراک سے خون کے عطیہ کیمپ کا انعقاد کیا گیا۔ کیمپ کا افتتاح ڈاکٹر راجیش گدیور نے کیا۔ اس موقع پر اودھوتک سداشیواچاریہ، انکش امبلے، عمر بیجاپور، روپیش دودھانی، شاکر شیخ موجود تھے۔ پروگرام کی صدارت پرنسپل اقبال تمبولی نے کی۔ اس کیمپ کو کامیاب بنانے کیلئے ڈاکٹر دیپک نارائنکر، غوث شیخ، ڈاکٹر مشتاق شیخ، ڈاکٹر زین الدین ملا اور ڈاکٹر سچن راج گرو نے خصوصی محنت کی۔

9/1/23

"दैनिक संचार"
" Daily Sanchar"

दि. १०/०१/२०२३
Dt: 10/01/2023

10/1/23

संचार

# फातिमा बी यांचे कार्य उशिरा उजेडात

## पुण्यात पहिले फातिमा बी शेख साहित्य संमेलन संपन्न

संचार प्रतिनिधी

**सोलापूर, दि. ९** - मुस्लीम समाजातील पहिल्या महिला शिक्षिका फातिमा बी शेख यांचे कार्य आजपर्यंत अंधारात होते. परंतु उशिरा का होईना त्यांच्या नावाने झालेल्या मराठी संमेलनातून ते उजेडात आले. याबद्दल आपल्याला समाधान वाटत असल्याचे मत संमेलनाध्यक्षा अनिसा शेख यांनी व्यक्त केले.

पुणे येथे पहिले फातिमा बी शेख मराठी साहित्य संमेलन पार पडले. त्यावेळी या संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून शेख बोलत होत्या. याप्रसंगी फातिमा बी या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. तत्पूर्वी ॲड. जयश्री बोडेकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या संमेलनाचे उद्घाटन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सय्यद जब्बार पटेल व संमेलनाचे स्वागताध्यक्ष बा. ह. मगदूम, ॲड. हाशम पटेल, सलीम शेख आदिंच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. प्रास्ताविक संस्थापक शफी बोल्डेकर यांनी केले. यावेळी सामाजिक लेखिका तमन्ना इनामदार (पुणे) यांना सिकंदर शेख यांच्या स्मरणार्थ युग स्त्री फातिमा बी शेख समाजभूषण पुरस्कार तर कवयित्री नसीम जमादार कोल्हापूर यांना साहित्यरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या संमेलनात नसीम जमादार लिखित नो मॅन्स लँड या एकांकिकेचे तर संमेलन स्मरणिका स्पंदनचे प्रकाशन करण्यात आले. तसेच फातिमा बी यांच्या नावाने पुणे विद्यापीठात स्वतंत्र अध्यासन केंद्र स्थापन करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात यावा, अशा मागणीचा ठरावही यावेळी सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यावेळी कवी संमेलनही पार पडले. पुढील साहित्य संमेलन सोलापूर येथे होणार असल्याची घोषणा आयोजकांच्यावतीने अय्युब नल्लामंदू यांनी केली. या संमेलनास सोलापूरचे प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी, गझलकार साबिर सोलापुरी, बालभारतीचे किरण केंद्रे, अंबादास शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



सूत्रसंचालन शबाना मुल्ला व खाजाभाई बागवान यांनी केले. तर आभार कार्यवाह इंतेखाब फराश यांनी मानले.

दैनिक
Email:-dailylokpradhan@gmail.com
# लोकप्रधान
वर्ष ८ वे | अंक ९२ | बुधवार, दि. ११ जानेवारी २०२३ | पृष्ठे

# सोशल महाविद्यालयात उर्दू विभागातर्फे उर्दू पत्रकार पुरस्कार विजेत्यांचा सत्कार संपन्न

लोकप्रधान न्युज नेटवर्क

सोलापूर:आज समाजात आपल्या मूळ उर्दू भाषा हे फार मागे आहे. याचा दर्जा वाढविण्यासाठी सगळ्यांनी उर्दू वृत्तपत्राची विक्री वाढली पाहिजे जेणे करून या भाषेचा दर्जात वाढ होईल, असे उदगार सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस एड कॉमर्स महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी यांनी केले.



यावेळी व्यासपीठावर उर्दू विभागप्रमुख प्रा. डॉ. शफी चोबदार, प्रा. डॉ. गौस शेख, पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर, आसिफ जुनैदी व प्रा. तस्नीम वड्डो उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी हे हो-ते.नुकत्याच सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने उर्दू पत्रकारितेला दोनशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल उर्दू पत्रकारांना 'उर्दू पत्रकारितेचे वारसदार'हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचा सत्कार समारंभ सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. यात पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर व आसिफ जुनैदी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषणात डॉ. म. शफी चोबदार यांनी उर्दू वृत्तपत्राचा इतिहास व पुरस्कार विजेत्यांचा परिचय सांगितला व पुढे म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यामध्ये उर्दू वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सूत्रसंचालन प्रा. तस्नीम वड्डो यांनी तर आभार डॉ. गौस शेख यांनी मानले.

दैनिक
जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर.. 11/01/2023

# उर्दू विभागातर्फे उर्दू पत्रकार पुरस्कार विजेत्यांचा सत्कार



सोलापूर : आज समाजात आपल्या मूळ उर्दू भाषा हे फार मागे आहे. याचा दर्जा वाढविण्यासाठी सगळ्यांनी उर्दू वृत्तपत्राची विक्री वाढवली पाहिजे जेणे करून या भाषेचा दर्जात वाढ होईल, असे उदगार सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस एड कॉमर्स महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी यांनी केले.यावेळी व्यासपीठावर उर्दू विभागप्रमुख प्रा. डॉ. शफी चोबदार, प्रा. डॉ. गौस शेख, पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर, आसिफ जुनैदी व प्रा. तस्नीम वड्डो उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी हे होते.नुकत्याच सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने उर्दू पत्रकारितेला दोनशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल उर्दू पत्रकारांना 'उर्दू पत्रकारितेचे वारसदार'हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचा सत्कार समारंभ सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. यात पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर व आसिफ जुनैदी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषणात डॉ. म. शफी चोबदार यांनी उर्दू वृत्तपत्राचा इतिहास व पुरस्कार विजेत्यांचा परिचय सांगितला व पुढे म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यामध्ये उर्दू वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सूत्रसंचालन प्रा. तस्नीम वड्डो यांनी तर आभार डॉ. गौस शेख यांनी मानले.

सकाळ

Dt:- 11/01/2023

# उर्दू पत्रकार पुरस्कार विजेत्यांचा सत्कार

## ोशल महाविद्यालयातील उर्दू विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. १० : सोशल ावविद्यालयात उर्दू विभागातर्फे पत्रकार पुरस्कार विजेत्यांचा ्कार करण्यात आला. यावेळी ासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी चार्य डॉ. इ. जा. तांबोळी, उर्दू भागप्रमुख प्रा. डॉ. शफी चोबदार, . डॉ. गौस शेख, पुरस्कार विजेते म. ्बाल बागबान, सुल्तान अख्तर, ासि जुनैदी व प्रा. तस्नीम वड्डो ास्थित होते.

नुकत्याच सोलापूर जिल्हा ाठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारितेला दोनशे वर्षे पूर्ण ल्याबद्दल उर्दू पत्रकारांना 'उर्दू पत्रकारितेचे वारसदार' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचा सत्कार समारंभ सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. यात पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर व आसिफ जुनैदी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

उर्दू वृत्तपत्राचा इतिहास व पुरस्कार विजेत्यांचा परिचय सांगून प्रास्ताविक भाषणात डॉ. म. शफी चोबदार म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यामध्ये उर्दू वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रा. वड्डो यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गौस शेख यांनी आभार मानले.




**सोलापूर : उर्दू पत्रकार पुरस्कार विजेत्यांच्या सत्काराप्रसंगी डावीकडून म. इक्बाल बागबान, प्र. प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी, सुल्तान अख्तर, आसिफ जुनैदी, डॉ. गौस शेख, डॉ. म. शफी चोबदार.**

# जनमत सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

at@gmail.com बुधवार ११ जानेवारी २०२३ वर्ष १३ अंक


## सोशल महाविद्यालयात उर्दू विभागातर्फे उर्दू पत्रकार पुरस्कार विजेत्यांचा सत्कार संपन्न

सोलापूर,दि. १० (प्रतिनिधी) आज समाजात आपल्या मूळ उर्दू भाषा हे फार मागे आहे. याचा दर्जा वाढविण्यासाठी सगळ्यांनी उर्दू वृत्तपत्राची विक्री वाढवली पाहिजे जेणे करून या भाषेचा दर्जात वाढ होईल, असे उदगार सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर उर्दू विभागप्रमुख प्रा. डॉ. शफी चोबदार, प्रा. डॉ. गौस शेख, पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर, आसिफ जुनैदी व प्रा. तस्नीम पठाण उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी हे होते.



नुकत्याच सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने उर्दू पत्रकारितेला दोनशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल उर्दू पत्रकारांना 'उर्दू पत्रकारितेचे वारसदार' हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचा सत्कार समारंभ सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. यात पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर व आसिफ जुनैदी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषणात डॉ. म. शफी चोबदार यांनी उर्दू वृत्तपत्राचा इतिहास व पुरस्कार विजेत्यांचा परिचय सांगितला व पुढे म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यामध्ये उर्दू वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सूत्रसंचालन प्रा. तस्नीम पठाण यांनी तर आभार डॉ. गौस शेख यांनी मानले.

पुण्य नगरी

Date:- 11/01/2023

करण्यात येणार आहे. : अभिनंदन केले.

# सोशलमध्ये उर्दू पत्रकार पुरस्कार विजेत्यांचा सन्मान




**सोलापूर / प्रतिनिधी**

सद्या समाजात मूळ उर्दू भाषा खूप मागे पडली आहे. उर्दूचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न गरजेचे आहे. यासाठी आता विविध उपाययोजनांसह पुढे यावे, यातून निश्चितच उर्दूचा विकास होईल, असे उद्‌गार सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी यांनी काढले.

सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने उर्दू पत्रकारितेला दोनशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल उर्दू पत्रकारांना 'उर्दू पत्रकारितेचे वारसदार' हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचा सत्कार समारंभ सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. यात पुरस्कार विजेते म. इक्बाल बागबान, सुल्तान अख्तर व आसिफ जुनैदी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. इ.जा. तांबोळी हे होते. यावेळी व्यासपीठावर उर्दू विभागप्रमुख प्रा. डॉ. शफी चोबदार, प्रा. डॉ. गौस शेख उपस्थित होते. डॉ. चोबदार यांनी उर्दू वृत्तपत्राचा इतिहास सांगितला. देशाच्या स्वातंत्र्यामध्ये उर्दू वृत्तपत्रांनी महत्वाची भूमिका बजावली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तस्नीम वड्डो यांनी तर आभार डॉ. गौस शेख यांनी मानले.

Smart Solapur Edition
Jan 11, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

" दैनिक दिव्य मराठी "
" Daily Divya Marathi "

दि. 30/01/2023
Date :- 30-01-2023.

सिटी न्यूज




योगिराज वाघमारे लिखित 'पत्रास कारण की..' आणि डॉ. सारीपुत्र तुपेरे लिखित 'तुझ्या बोटाच्या दिशेने चालत आहे' या ग्रंथांच्या प्रकाशन प्रसंगी मान्यवर.

# डॉ. सारीपुत्र तुपेरे यांच्या पुस्तकातील कविता आंबेडकरी तत्त्वज्ञान मांडणारी

## डॉ. तांबोळी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । सोलापूर

डॉ. सारीपुत्र तुपेरे यांच्या 'तुझ्या बोटाच्या दिशेने चालत आहे..' या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता वाचकांना आंबेडकरी तत्त्वज्ञान सोपे करून सांगतात. समतावादी विचारांची पेरणी करणारा हा काव्यसंग्रह आंबेडकरी साहित्यात मोलाची भर घालणारा आहे, असे प्रतिपादन सोलापूर सोशल कॉलेजचे प्राचार्य डॉ. इ. जा.तांबोळी यांनी केले. थिंक टँक पब्लिकेशन्स प्रकाशित योगिराज वाघमारे लिखित 'पत्रास कारण की..' आणि डॉ. सारीपुत्र तुपेरे लिखित 'तुझ्या बोटाच्या दिशेने चालत आहे' या ग्रंथांचे प्रकाशन नुकतेच झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी सोशल कॉलेजचे प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी होते. प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ लेखक डॉ. शेरअली शेख, ज्येष्ठ विचारवंत डॉ. एम.. डी. शिंदे, बौद्ध साहित्याचे अभ्यासक डॉ. संघप्रकाश दुड्डे यांनी मार्गदर्शन केले. विचारमंचावर योगिराज वाघमारे, डॉ. सारीपुत्र तुपेरे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. इ. जा.तांबोळी म्हणाले की, 'तुझ्या बोटाच्या दिशेने चालत आहे..' या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता वाचकांना तत्त्वज्ञान सोपे करून सांगते. यावेळी डॉ. तांबोळी यांनी कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेचा संदर्भ देत तथागत गौतम बुद्धांची करुणा, बुद्ध विचारांची दिशा मानवी जीवनात किती महत्त्वाची आहे याचे विश्लेषण केले.

यावेळी डॉ. एम. डी. शिंदे म्हणाले की, योगिराज वाघमारे यांनी 'पत्रास कारण की...' या ग्रंथात समाजातील वास्तव स्थितीवर अत्यंत संवेदनशीलपणे भाष्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्यागामुळे आपला विकास झाला. शिक्षण मिळाले, आर्थिक संपन्नता आली. त्या बाबासाहेबांनाच विसरतात.

"दैनिक इनकलाब"
"Inquilab"

दि:- 03/02/2023
Date:- 03/02/2023

## ایس ایس اے کالج، شولاپور کی جانب سے تہنیتی پروگرام




**شولاپور:** مورخہ ۲۶ رجنوری کو شولاپور ضلع مراٹھی پترکار سنگھ کی جانب سے اقبال باغبان، سلطان اختر اور آصف جنیدی کو 'وارث اردو صحافت' کے اعزاز سے نوازے جانے پر ان تینوں اعزاز یافتگان کو ایس ایس اے آرٹس اینڈ کامرس کالج کی جانب سے تہنیت پیش کی گئی۔ جلسے کی صدارت پرنسپل اقبال تانبولی نے کی۔ سلطان اختر نے شعبہ اردو کی کارکردگی کی ستائش کی۔ اس موقع پر صدر شعبہ اردو ڈاکٹر شفیع چوبدار اور ڈاکٹر غوث احمد شیخ موجود تھے۔ تسنیم وڈے نے نظامت کے فرائض انجام دیئے۔

दिनांक:- १३/०३/२०२३
दैनिक "संचार"

Date:- 13/03/2023
Daily:- Sanchar

## सोशल महाविद्यालय

येथील सोलापूर सोशल आर्टस् ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यापीठस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या डॉ. इ.जा. इंगळे होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नजीर मुन्शी उपस्थित होते. यावेळी स्त्री सक्षमीकरणासाठी आवश्यक बाबी व स्त्री शक्तीची जाणीव या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी अमृता अकलूजकर होत्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पेपरचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अस्मा खान यांनी केले. आभार डॉ. ए.ए. गढवाल यांनी मानले.

Daily Urdu Times Date :- 30/04/2023

# شولا پور سوشل اسوسی ایشن آرٹس اینڈ کامرس کالج سولا پور کے زیر اہتمام عید ملن کا انعقاد




سولا پور (سلطان اختر) شولا پور سوشل اسوسی ایشن آرٹس اینڈ کامرس کالج سولا پور کے زیر اہتمام عید ملن کا انعقاد عمل میں آیا۔ اس موقع پر بطور مہمان خصوصی سولا پور یونیورسٹی کی وائس چانسلر ڈاکٹر فرونویس نے کہا کہ عید ملن گنگا جمنا تہذیب کی ضمانت ہے۔ کالج کے پرنسپل اقبال تمبولی نے مہمانان کا استقبال کیا۔ نظامت جے۔ این۔ ملا نے کی۔ اس موقع پر بطور مہمان رجسٹرار یوگینی دھارے، ڈاکٹر گادیوار، ڈاکٹر نولے، ڈاکٹر سرودے، ڈاکٹر دلال، بیباک صحافی وشاعر ایوب نلامندو شریک تھے۔ اس موقع پر ڈاکٹر بیلے گاونکر، ڈاکٹر چنگی، ڈاکٹر مہ جبین وڈوان، ڈاکٹر گدوال، ڈاکٹر غوث شیخ، مظہر الوڑی و دیگر معزز شریک تھے ۔بعد پروگرام شیر خورمہ، سمیت ضیافت کا اہتمام کیا گیا تھا۔

Urdutimes Mumbai 30/04/2023

Daily Asia Express Date:- 30/04/2023

# شولاپور سوشل اسوسی ایشن آرٹس اینڈ کامرس کالج میں عید ملن کا انعقاد




سولاپور (سلطان اختر) شولاپور سوشل اسوسی ایشن آرٹس اینڈ کامرس کالج سولاپور کے زیر اہتمام عید ملن کا انعقاد عمل میں آیا۔ اس موقع پر بطور مہمان خصوصی سولاپور یونیورسٹی کی وائس چانسلر ڈاکٹر فڑنویس نے کہا کہ عید ملن گنگا جمنا تہذیب کی ضمانت ہے۔ کالج کے پرنسپل اقبال تمبولی نےمہمانان کا استقبال کیا۔ نظامت جے۔ این۔ ملانے کی۔ اس موقع پر بطور مہمان رجسٹرار یوگینی دھارے، ڈاکٹر گادیوار، ڈاکٹر نولے، ڈاکٹر سرودے، ڈاکٹر دلال، بیباک صحافی و شاعر ایوب نلامندو شریک تھے۔ اس موقع پر ڈاکٹر بلیگاونکر، ڈاکٹر چنگی، ڈاکٹر مہ جبین وڈوان، ڈاکٹر گدوال، ڈاکٹر غوث شیخ، مظہر الوڑی و دیگر معزز شریک تھے۔ بعد پروگرام شیر خورمہ، سمیت ضیافت کا اہتمام کیا گیا تھا۔

Daily "Puny Nagri" Date- 30/04/2023

पुण्यनगरी

# 'ईद मिलन'द्वारे गंगा-जमुना संस्कृतीचे दर्शन



सोलापूर / प्रतिनिधी

प्रत्येक सण हे एकत्रितपणे साजरे करण्यामध्ये सर्वधर्मसमभाव निर्माण होतो. या माध्यमातून मने जोडली जातात. आजच्या ईद मिलन कार्यक्रमद्वारे भारताची गंगा-जमुनी संस्कृतीचे दर्शन घडले, असे प्रतिपादन अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉक्टर मृणालिनी फडणवीस यांनी केले.

सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेजच्या वतीने आयोजित 'ईद मिलन' कार्यक्रमात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर योगीनी धारे, डॉ.गादेवार, प्राचार्य इ.जा. तांबोळी, डॉ.नवले, डॉ.सरवदे, डॉ.दलाल, अय्यूब नल्लामंदू आदी उपस्थित होते.

सुत्रसंचलन डॉ.जे. एन. मुल्ला यांनी केले. याप्रसंगी डॉ. श्रीकांत येळेगांवकर, डॉ.पतकी, डॉ.महेजबीन वडवान, डॉ.शकील शेख, डॉ.गदवाल, डॉ.गौस शेख, डॉ.राजगुरु, डॉ.नरेंद्र काटीकर, डॉ. खान, डॉ.वड्डो, मजहर अल्लोळी आदी उपस्थित होते.

Smart Solapur Edition
May 1, 2023 Page No. 01
Powered by : eReleGo.com

Daily "Divya Marathi" Date: 30/04/2023

दिव्य मराठी

# रमजाननिमित्त सोशल महाविद्यालयात ईद-ए-मिलन

सोलापूर । रमजाननिमित्त सोशल महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेला ईद-ए-मिलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, योगिनी घारे, डॉ. गादेवार, डॉ. नवले, डॉ. सरवदे, माजी प्राचार्य डॉ. दलाल, अय्युब नल्लामंदू यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य इ. जा. तांबोळी यांनी केले. रमजान झाल्यानंतर विविध सामाजिक संस्थांच्या वतीने असे ईद ए मिलन कार्यक्रम आयोजित करतात. शुक्रवारी सायंकाळी सोशल महाविद्यालयात हिंदू-मुस्लिम सर्व शिक्षकांनी शिरखुर्म्याचाआस्वाद घेतला. यावेळी डॉ. श्रीकांत येळेगांवकर, डॉ. पतकी, डॉ. मुबीन वडवान, डॉ. शकील शेख, डॉ .गदवाल, डॉ. गौस शेख, डॉ. राजगुरू, डॉ. नरेंद्र काटीकर, डॉ. खान, डॉ. वड्डो आदींसह अनेकांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन जे. एन. मुल्ला यांनी केले.

"दैनिक पुण्य नगरी" दि :- १०/०५/२०२३
"Daily Punya Nagri" Date :- 10/05/2023

# सोशल महाविद्यालयात उर्दू पुस्तकाचे प्रकाशन



**सोलापूर / प्रतिनिधी**

सोशल असोसिएशन कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये उर्दू विभाग प्रमुख डॉ. मोहम्मद शफी चोबदार लिखित पुस्तक 'तलखीस चांद आसनाफे नसर' चे प्रकाशन महाविद्यालयाचे जेष्ठ सेवक अब्दुल रहीम मणियार आणि साहेबराव क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ई. जा. तांबोळी हे होते. डॉ. गढवाल यांनी कार्यक्रमांची प्रस्तावना केली. पुस्तकाचे विश्लेषण करताना प्रा. डॉ. चोबदार यांनी हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असून एक चांगला संदर्भ ग्रंथ देखील असल्याचे सांगितले. यावेळी अब्दुल रहीम मणियार यांनी हे पुस्तक कष्ट करून लिहिलेले पुस्तक असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे सांगितले. प्राध्यापक डॉ. चोबदार यांनी या पुस्तकात समाविष्ट असलेले प्रत्येक प्रकरणावर एज्युकेशनल व्हिडिओ तयार करीत आहोत. पुढच्या आवृत्तीमध्ये बारकोड छापण्यात येईल. विद्यार्थी ते बारकोड स्कॅन केल्यानंतर त्यांना त्या प्रकरणाचे व्हिडिओ बघता येईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन पुस्तक प्रकाशन करण्याचा मानसही त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. तर प्राचार्य डॉ. तांबोळी यांनी डॉ. चोबदार यांनी आतापर्यंत विद्यार्थ्यांसाठी ३० पुस्तकांचे संपादन केले असून विद्यार्थ्यांसाठी उर्दूचे संदर्भ ग्रंथही उपलब्ध करून दिले आहेत. त्यांचे हे काम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. इनामदार यांनी तर प्राध्यापक एम.डी. शेख यांनी आभार मानले.

"दैनिक लोकमत"
" Lokmat Paper"

दि:- १२-०५-२०२३
Date:- 12-05-2023

दाखल करण्यात आले आहे.

# सेवकांच्या हस्ते उर्दू पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोशल असोसिएशन कला व वाणिज्य महाविद्यालय उर्दू विभागप्रमुख डॉ. मोहम्मद शफी चोबदार लिखित पुस्तक 'तलखीस चांद आसनाफे नसर'चे प्रकाशन महाविद्यालयाचे ज्येष्ठ सेवक अब्दुल रहीम मणियार आणि साहेबराव क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ई. जा. तांबोळी होते. डॉ. गढवाल यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एम.डी. शेख यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. एस. इनामदार यांनी केले.

" दैनिक दिव्य मराठी "
" Divya Marathi "

दि:- १२/०६/२०२३
Date:- 12/06/2023

…राज्याचे सह… …केले.

…सूत्रसंचालन केले. गौरीशंकर मडगुदल यांनी आभार मानले.

# औद्योगिक समाजशास्त्र आणि वस्त्रोद्योगाचे समाजशास्त्र पुस्तकांचे कॉलेजात प्रकाशन

## प्रभारी कुलगुरू कामत यांच्याकडून प्रा. डॉ. गढवाल यांचे कौतुक

**प्रतिनिधी** | सोलापूर



प्रा. डॉ. ए. ए. गढवाल यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

एस. एस. ए. आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजमधील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. ए. ए. गढवाल लिखित इंडस्ट्रियल सोशॉलॉजी आणि सोशॉलॉजी ऑफ टेक्स्टाइल इंडस्ट्री या दोन पुस्तकाचे प्रकाशन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

औद्योगिक संस्था मानव संसाधन कामगार कायदे, कामगार संघटना, जड उद्योगांचे विकेंद्रीकरण, व्यवसाय वाद, सेवा व्यवसाय, पांढरपेशी व्यवसाय यासारख्या मुद्द्यांची मांडणी डॉ. गढवाल यांनी आपल्या पुस्तकात केलेली आहे, असे मत कुलगुरू कामत यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य डॉ.देवानंद चिलवंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. डॉ. जे. के. मुल्ला यांनी प्रास्तविक केले. डॉ. शफी चोबदर यांनी परिचय करून दिला. डॉ. सचिन राजगुरू यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपक नारायणकर यांनी आभार मानले.